*Norms of work-load for full-time and part-time College teachers.*

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## EDUCATION AND EMPLOYMENT DEPARTMENT

Resolution No. NGC/2080/160284 (5987)/UNI-2
Mantralaya Annexe, Bombay 400 032,
Dated 1st June 1981

*Read*—

(i) Government Resolution, Education and Youth Services Department, No. UGC/1179/152275/XXXII(Cell), dated 15th February 1979.

(ii) Government Resolution, Education and Youth Services Department, No. NGC/2079/4781/XXV, dated 24th March 1980.

(iii) Government Resolution, Education and Employment Department, No. NGC/2080/159744/XXV, dated 23rd May, 1980.

(iv) Government Addendum, Education and Employment Department, No. NGC/2079/4781/XXV, dated 28th May 1980.

(v) Government Circular, Education and Employment Department, No. NGC/2079/167026/XXV, dated 1st September 1980.

(vi) Letter, dated 16th September 1980 from the Joint Board of Vice-Chancellors.

(vii) Government Resolution, Education and Employment Department, No. USG/1177/129387/XXXII(Cell), dated 25th November 1980.

(viii) Minutes of the meetings Education Secretary had with the representatives of the MFUCTO on 20th November 1980, 10th March 1981 and 28th April 1981.

(ix) Government Circular, Education and Employment Department, No. NGC/2079/167026/UNI/2, dated 24th March 1981.

(x) Government Resolution, Education and Employment Department, No. USG/1180/157008 (223)/UNI/4, dated 27th April 1981.

## *RESOLUTION*

The question of prescribing uniform norms for minimum work-load for full-time and part-time teachers in colleges of Arts, Science, Commerce and Education attached to non-Agricultural Universities in the State was under consideration of the Government and certain orders were issued under Government Resolution, Education, Employment and Youth Services Department, No. NGC/2079/4781/XXV, dated 24th March 1980. Several representations were received from the various teachers bodies and the colleges concerned pointing out that the adoption of these norms would adversely affect the teaching community and the efficiency and standard of teaching. The Government therefore, referred this question to the J. B. V. Cs. for their considered advice. The operation of the above mentioned Government Resolution was also stayed pending a further review of the matter. The recommendations of the Vice-Chancellors have since been received and the matter has been further examined by Government after discussions with the representatives of the Teachers. The Government is now pleased to issue following instructions in this behalf.

### I. WORK-LOAD OF FULL TIME COLLEGE TEACHERS

2. As recommended by the University Grants Commission, the overall work-load of a full time college teacher will be 40 clock hours per week out of these 40 clock hours, the teacher is expected to put in work of 20 clock hours per week on the college premises. Of the 20 clock hours, the class room instruction work would consist of 17 Lectures each of 45 minutes duration and 3 tutorials each of 45 minutes duration per week together equivalent to 15 clock hours per week. In case of colleges affiliated to any University having no obligatory system of tutorials, the teacher himself on his own will make good the short-fall in the prescribed workload by engaging extra classes for intensive teaching of students in his own subject. The remaining 5 clock hours on the premises should be spent by a full-time teacher on guidance, consultation by students, curricular and extra curricular activities, administration and professional work etc. The staffing pattern of college teachers accordingly should be worked out on the basis of the above norms, subject to the following :—

(a) A college teacher entrusted with the work of post-graduate teaching may be given remission at the rate of one clock hour of post-graduate teaching equal to two periods each of 45 minutes of under graduate teaching. This means that if the period of post-graduate teaching is of 45 minutes, the corresponding remission accruing to such a teacher will be 1½ periods of under-graduates teaching. If a teacher is attending to post-graduate research/demonstration work, two clock hours of demonstration at post-graduate level should be considered as equivalent to one hour of lecturing at the under-graduate level. Similarly, if a teacher is recognised guide for Ph.D., remission of two periods of 45 minutes be given for guiding students. This is on the understanding that the additional work on account of post-graduate teaching, research and guiding of students for Ph.D. work together will not in any case computed in excess of six periods of 45 minutes duration of under-graduate teaching for the purposes of remission.

Scanned with CamScanner

(b) The Head of Department that is the senior most teacher in the Department should be given a remission of two under-graduate periods while the Vice-Principal so designated, may be given remission of four under-graduate periods. The remission in work-load for a Vice-Principal who also happens to be a Head of Department should be subject to a maximum of six under-graduate periods of 45 minutes duration. Remission in case of a Vice-Principal has been given without prejudice to the decision which Government may take in due course about indentifying in general the institution of Vice-Principal in affiliated colleges of Arts, Science, Commerce and Education in the State, for purposes of grant-in-aid.

(c) Where there is one man department the teacher concerned should be considered as a full-timer even if he has a work-load of 12 periods per week. This is, however, on the understanding that he will make good the shortfall in teaching work by taking lectures in Junior college. If Junior college is not attached to his college, he will make good the shortfall in teaching work by engaging extra classes on his own for intensive teaching of students in his own subject.

(d) There may be some cases wherein a College teacher may have been entrusted exclusively with post-graduate teaching/research and practicals. In his case, the maximum workload should be 10 clock hours for the purposes of computing this maximum workload. The work of Seminars, Demonstrations etc. will be calculated at the rate of one clock hour of under-graduate teaching for every two clock hours of post-graduate teaching.

(e) In a multi-teacher Department, the work-load should be distributed on the basis of 17 lectures plus three tutorials per week per teacher. If the last teacher has a work-load of less than 12 periods, then alone he should be regarded as a part-timer.

(f) It is expected that in this arrangement, no marginal workload will be left for the last teacher, necessitating the payment to him on an hourly basis, his workload being less than 8 periods per week.

(g) For the sake of uniformity, the teaching period for under-graduate classes in colleges affiliated to all Universities should necessarily be of a duration of 45 minutes only. This will however, not entail any increase in the number of periods assigned to each subject per week as at present.

3. For giving effect to these norms of workload, it will be necessary for Universities to make statutes under the respective University Acts, of 1974. For ensuring immediate implementation of these norms, the Vice-Chancellors of Universities may consider regulating the matter by issuing directions pending making of statues by their Universities under clause (b) of Section 11 (6) of the respective University Act of 1974.

4. Orders issued under Government Resolution, dated 24th March 1980, 23rd May 1980 and 28th May 1980 referred to in the preamble, permitting the degree college teachers to make good the shortfall in the teaching workload for degree colleges by taking lectures in Junior Colleges, where such colleges are attached to the degree colleges will as per position obtaining on 31st March 1980, continue to apply and it is expected that the shortfall in the lecturing work of degree college teachers will continue to be made good by taking lectures in Junior Colleges, wherever available.

## II. Workload of Part-Time College Teachers

5. Orders have already been issued prescribing a regular pay scale for part-time teachers, which is equivalent to half the pay scale applicable to full-time teachers. It is hereby clarified that the maximum workload of a part-time teacher in colleges should be more than half of the workload of full-time teacher viz. 11 periods of 45 minutes, subject to a teaching work of minimum 8 periods of 45 minutes per week. This would mean a part-time teacher entitled to the revised time scale will be engaging minimum of 8 and maximum of 11 periods per week.

6. It is expected that the total workload should be so distributed that there will be no need to employ teachers necessitating payments to them on an hourly basis.

7. It is hereby directed that the workload of teachers should now be reviewed or regulated in accordance with the above instructions, which supercede all instructions issued previously in this regard *vide* Government Resolutions and Government Circular quoted in the preamble.

8. This Government resolution issues with the concurrance of the Finance Department *vide* its unofficial reference No. 1319/81/EXO-5, dated 25th May 1981.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१२१२१५३

क्रमांक-उशिसं/विधी/बीसीआय त्रुटी/१६-१७/मवि-२/१४२७८ दिनांक : १६ डिसेंबर, २०१६

**महत्वाचे -**

प्रति,

प्राचार्य,
सर्व विधी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

**विषय : राज्यातील विधी महाविद्यालयास बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियम लागू करण्याबाबत.**

संदर्भ : शासन पत्र क्र. विधी-२०१६/प्र.क्र.२४२/मशि-२, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६.

उपरोक्त संदर्भाधीन विषयी, राज्यातील विधी महाविद्यालयांनी बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियमानुसार आवश्यक असणाऱ्या खालील बाबींची विहित कालमर्यादेमध्ये पूर्तता करावी.

१. पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत, शासकीय / अशासकीय अनुदानित / कायम विना अनुदानित विधी महाविद्यालयांनी १:४० या शिक्षक : विद्यार्थी गुणोत्तर प्रमाणात महाविद्यालयांमध्ये शिक्षक नियुक्त करणेबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

२. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या Rules of Legal Education २००८ मध्ये विधी महाविद्यालयांच्या बाबतीत पायाभूत / भौतिक सोयीसुविधांचे अनुषंगाने असलेल्या तरतुदीनुसार आपले विधी महाविद्यालयांमध्ये आवश्यक त्या पायाभूत / भौतिक सोयीसुविधा पुढील एक वर्षाच्या कालावधीमध्ये पुर्ण कराव्यात.

उपरोक्त नमुद बाबींची पूर्तता करणेसाठी तात्काळ कार्यवाही करुन विहित कालमर्यादेचे काटेकोरपणे पालन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास पाठविण्यात यावा.

(डॉ. वि. रा. मोरे)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी -
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे , महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -
१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

Scanned with CamScanner

अनु-३

**अकृषी विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित**
**कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये-**
**अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना अनुदाने**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक एनजीसी १०९९/( ३६३ /९९) मशि-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २९ डिसेंबर १९९९.

वाचा :-
१) शा.नि.शि.से.व यू.से.वि.क्र.एनजीसी १२७९/१५७७९६/२५.दिनांक ३/१०/१९७९
२) शा.प.शि.रो. व यु.से.वि.क्र.युएमएफ १०७९/४९७९/(३)पंचवीस दि.२५/९/१९७९
३) शा.प.शि.व रो.वि.क्र.एनजीसी २३८१/११४९८३/(६७५४)/युनि-२दि १/६/१९८२
४) शा.नि.से.यो.वि.क्र.एनजीसी २०८८/(१६५२)विशि २(अ) दि ४/१/१९८९
५) शा.नि.शि. व से.यो.वि.क्र.एनजीसी २०९१/(३५६७)/ विशि-२अ दि ८/८/१९९१
६) शा.नि.शि.व से.यो. वि.क्र.एनजीसी १०९१/(३५६७)विशि २अ दि २४/९/१९९१
७) शा.नि.शि.व से.यो.वि.क्र.एनजीसी ३५८८/१२९४/विशि-२ दि. १४/५/१९९२
८) शा.प.उ. व तं. शि. आ.से.यो.वि. क्र एनजीसी ३५९३/५४४३/विशि २ दि २४.९.१९९३
९) शा.प.उ. व तं. शि.आ.से.यो.वि.क्र.एनजीसी १०९८/७६३८/मशि ३.दि २१/१२/१९९४
१०) शा.नि.उ. व तं.शि. आ. से.यो. वि.क्र.एनजीसी१०९३/(५९१८) मशि ३ दि १९/६/१९९५
११) शा.नि. उ. व तं. शि. आ.से.यो.वि.क्र.बीयुसी १०८८/(२०२९)/मशि ३ दि १०/१/१९९६
१२) शा.नि. उ. व तं. शि. आ.से.यो.वि.क्र मुविसं ११९६/विसअ (५०१/९६) मशि ३ दि ५.६.१९९६

**प्रस्तावना :-** अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना नियमित व पूर्ण वेतन व भत्ते मंजूर दराने मिळण्यासाठी शासनाने बँकेमार्फत पगार देण्याची योजना मंजूर केली आहे. तसेच संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनावरील अनुदान देण्याचे धोरण शासनाने ठरविल्यानंतर अशासकीय महाविद्यालयांना १/४/१९७९ पासून वेतन अनुदान योजना लागू करण्यात आली आहे. या वेतन योजना विचारात घेऊन व इतर बाबीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचा विचार करुन संकलित आदेश काढण्याचा प्रश्न विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-** संदर्भीय शासन निर्णय /परिपत्रकान्वये अकृषी विद्यापीठांशी संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयातील मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन व अनुदान योजना शासनाने लागू केली आहे. या वेतन योजनेच्या आदेशांचे एकत्रिकरण करुन शासन आता एकत्रित आदेश निर्गमित करण्यांत येत आहे.

2..

Scanned with CamScanner

## (१) अशासकीय अनुदानित कला,विज्ञान,वाणिज्य,शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालय

(१) : अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आस्थापनावरील खर्चाची संपूर्ण जबाबदारी शासनाने घेतली आहे. त्यास अनुसरुन महाविद्यालयांना परिरक्षण अनुदान देण्याकरिता शासनाने दिनांक ३ ऑक्टोबर १९७९ रोजी नियम जारी केले आहेत. या नियमान्वये सर्व महाविद्यालयांकरिता सुधारित व समान असे अनुदान सूत्र १९७९-८० या सालापासून लागू करण्यात आले आहे. या सूत्राप्रमाणे परिरक्षण अनुदान खालीलप्रमाणे अनुज्ञेय असेल.

**रक्कम उपलब्ध असेल त्याप्रमाणे अ-ब इतके अनुदान देण्यात येईल.**

(अ) (१) महाविद्यालयाच्या आस्थापनावरील संपूर्ण खर्च त्या वर्षाच्या (प्रथम अंदाजित खर्चावर व नंतर समायोजन केल्या प्रमाणे ) यामध्ये मान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या अनुज्ञेय पगारावरील खर्चावर पूर्ण अनुदान

अधिक

(२) महाविद्यालयाच्या इमारतीवरील काही दुरुस्ती खर्च ठराविक दराने अथवा भाड्यापोटी दिलेल्या रकमेवर ७५% इतके अनुदान आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या निवासासाठी घेणा-या भाड्यावरील खर्चावर ठराविक दराने अनुदान विवरण पत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे.

अधिक

(३) वरील २(अ) (१) व (२) वगळून महाविद्यालयाने मागील वर्षात विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या बाबीवर प्रत्यक्ष खर्च केलेल्या रकमेच्या खालील टक्केवारीच्या मर्यादेप्रमाणे अनुदान देय राहिल.

(अ) जर महाविद्यालय हे पूर्णपणे विज्ञान महाविद्यालय असेल तर पूर्ण अनुज्ञेय पगारावरील खर्चाच्या १८ % इतके.

(ब) जर महाविद्यालय विज्ञान शाखेबरोबर इतरही शाखा असतील तर पूर्ण अनुज्ञेय पगारावरील खर्चाच्या १५ % इतके.

(क) जर महाविद्यालये ही शिक्षण महाविद्यालय अथवा पूर्णपणे कला /वाणिज्य महाविद्यालये असतील तर, किंवा जर त्या दोन्हीही शाखा त्या महाविद्यालयात असतील तर पूर्ण अनुज्ञेय पगारावरील खर्चाच्या १२ % इतके.

वजा

(ब)(१) फी व इतर मार्गाने उत्पन्न (शासनाच्या मान्य दरा प्रमाणे ) ज्या विद्यार्थ्यांनी स्वतः फी भरलेली असेल तो ( या फी मध्ये सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांच्या फी माफीचा समावेश नसेल )

(२) वरिष्ठ महाविद्यालयांना कनिष्ठ महाविद्यालये जोडली असलीत तर त्या कनिष्ठ महाविद्यालयातील जाद्य उत्पन्न.



Scanned with CamScanner

**स्पष्टीकरण** कनिष्ठ महाविद्यालयाच्या बाबतीत माध्यमिक शाळा अनुदान संहिते प्रमाणे ज्या बाबीवर खर्च अनुज्ञेय असेल व त्या बाबी वरिष्ठ महाविद्यालयाच्या बाबी पेक्षा निराळया असतील तर त्या बाबीचा खर्च जाद्य उत्पन्न म्हणून धरण्यात येईल.

(२) या आदेशा प्रमाणे यापुढे कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालयासाठी वरील प्रमाणे एकच समान अनुदान सूत्र अंमलांत येईल.

(३) परिरक्षण अनुदानासाठी महाविद्यालयानी विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या बाबीवर खर्च केलेली रक्कम अनुज्ञेय धरली जाईल..

(४) परिरक्षण अनुदानाच्या अटी खालीलप्रमाणे राहतील.

(अ) महाविद्यालयास विद्यापीठाने संलग्निकरण मंजूर केले असले पाहिजे. तसेच शासनाने विहित केलेली विद्यार्थी संख्या आवश्यक असली पाहिजे.

(ब) महाविद्यालय स्वयं:पूर्ण होण्यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे कमीत कमी विद्यार्थी संख्या विहीत करण्यात आली आहे. ही विहीत संख्या मागील वर्षाची राहिल व तीन वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाकरिता असेल. ( ही विहीत संख्या १ फेब्रु.रोजी प्रत्यक्ष प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची राहील व तिथे सिमीस्टर पध्दत आहे तीथे ती १ सप्टे. रोजी ही धरली जाईल. )

| प्रकार | एक शाखा कमीत कमी विद्यार्थी संख्या | दोन शाखा असताना | तीन शाखा असताना |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १) महानगरपालिकेच्या शहरातील किंवा बिगर शेतकी विद्यापीठाची मुख्यालय असलेल्या गावची महाविद्यालये. | ३०० | ५०० | ७०० |
| २) जी शहरे वरील क्रमांक १ मधील नाहीत व ज्या शहराची लोकसंख्या १ लाखाचे वर आहे अशा शहरातील महाविद्यालये. | २०० | ३५० | ५०० |
| ३) १लाखापेक्षा लोकसंख्या कमी असलेल्या शहरातील महाविद्यालये | १०० | १७५ | २५० |

शैक्षणिक वर्ष १९८२-८३ व त्यानंतर महाविद्यालयाने विहीत कमीत कमी विद्यार्थी संख्येची अट पूर्ण केली नाही तर मागील वर्षीच्या विद्यार्थ्यां संख्येची फी उत्पन्नाची रक्कम जमेस धरुन अनुदानाचा विचार करावा (ब) (१)प्रमाणे )

४..

Scanned with CamScanner

वरील अट शिक्षणशास्त्र महाविद्यालयाबाबतीत लागू राहणार नाही.

(५) नवीन अनुदानित महाविद्यालयांना परवानगी दिल्यावर वरील अनुदान सूत्रा प्रमाणे त्यांना अनुदान अनुज्ञेय राहील. मात्र त्यांना प्रथम वर्षाला अनुदान ग्राह्य धरले जाणार नाही.

(६) अनुदानित अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना या नवीन अनुदान सूत्राप्रमाणे अनुदान देण्याची पध्दत विवरणपत्र "ब" मध्ये देण्यात येत आहे.

(७) नवीन अनुदान सूत्र १/४/१९७९ पासून अंमलात आल्यावर सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शैक्षणिक फी सवलतीची रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही. सर्व वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील बौध्द धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्य, प्राथमिक शिक्षकाची मुले इत्यादिचा समावेश असेल. शैक्षणिक फी सोडून विद्यापीठांनी व शासनाने मान्य केलेली इतर फी (प्रवेश फी, प्रयोगशाळा फी, ग्रंथालय फी, जीमखाना फी व इतर मान्य बाबीवरील फी) जर वरील वर्गातील फी सवलत मिळणा-या विद्यार्थ्यांची फी ची प्रतिपूर्ती करण्यांत येईल.

(८) अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाचे संलग्निकरण व त्यांना द्यावयाचे शासकीय अनुदान त्रिवर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या वर्गासाठी किमान विद्यार्थी संख्येचे निकष खालील प्रमाणे राहतील.

(१) आदिवासी विभाग क्षेत्रात व ज्या पंचायत समिती क्षेत्रात एकच महाविद्यालय आहे. अशा महाविद्यालयातून अस्तित्वात असलेल्या प्रत्येक विद्याशाखेत पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या वर्गात किमान ३० विद्यार्थी असावेत. इतर क्षेत्रातील महाविद्यालयातून अस्तित्वात असलेल्या प्रत्येक विद्याशाखेत पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या वर्गात किमान ४० विद्यार्थी असावेत.

(२) विहित किमान ३० किंवा ४० विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षाच्या वर्गात प्रवेश घेतल्यामुळे तो वर्ग सुरु करण्यात आल्यानंतर प्रथम वर्षाच्या अखेरीस होणा-या परीक्षेस उपरोक्त दोन प्रकारच्या महाविद्यालयामधून प्रत्येकी अनुक्रमे किमान २२ व ३० विद्यार्थी परिक्षेला न बसल्यास पुढील वर्षी महाविद्यालयाला या वर्गासाठी झालेल्या खर्चावर (प्रमाणानुसार) शासनाकडून अनुदान देण्यात येणार नाही.

(९) **विशेष जादा विषयासाठी विद्यार्थ्यांची संख्येचे निकष**

(१) विशेष जादा विषयासाठी कमीत कमी विद्यार्थी संख्या खालील प्रमाणे राहील.

(अ) नगरपालिका क्षेत्रांत - ("क" नगरपरिषद वगळून) १५ विद्यार्थी प्रती विषय

(ब) इतर क्षेत्रात ५ विद्यार्थी प्रती विषय



Scanned with CamScanner

वरील विद्यार्थी संख्या प्रथम प्रवेश वर्षाकरिता राहिल. म्हणजेच ३ वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमास विशेष जादा विषयाची सोय १ ल्या वर्षी केली किंवा दुस-या वर्षी केली किंवा तिस-या वर्षी केली तर त्या त्या वर्षाच्या प्रवेशासाठी वरील विद्यार्थी संख्येची अट राहील. मात्र एखाद्या वर्गात प्रवेश दिल्यानंतर तो विषय नैसर्गिक वाढ म्हणून दुस-या किंवा तिस-या वर्गात शिकविला असेल तर अशा वेळी वरील विद्यार्थी संख्येच्या मर्यादेची अट राहणार नाही.

३) <u>नवीन विना अनुदानित महाविद्यालये तसेच नवीन विद्याशाखा/ विषय /अभ्यासक्रम व जादा तुकडयांना टप्प्याटप्प्याने अनुदान सुत्र.</u>

१९८३-८४ पासून विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या महाविद्यालयांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेऊन विहीत अटी व निकष पूर्ण करणा-या महाविद्यालयांना खालील अनुदानसूत्र कायम स्वरुपात मंजूर करण्यात आले आहे :-

अ) मान्यता देण्यांत आल्यानंतर पहिल्या ३ वर्षात नवीन महाविद्यालय, नवीन विद्याशाखा, नवा विषय, नवीन अभ्यासक्रम व जादा तुकडया याना कोणतेही अनुदान मंजूर करण्यांत येणार नाही.

ब) ४ थ्या वर्षी मान्य खर्चाच्या २५ टक्के
क) ५ व्या वर्षी मान्य खर्चाच्या ५० टक्के
ड) ६ व्या वर्षी मान्य खर्चाच्या ७५ टक्के
इ) ७व्या वर्षी मान्य खर्चाच्या १०० टक्के अशी टप्प्याटप्प्याने अनुदान वाढ करण्यात यावी.
ई) (१) मात्र विहीत अटी व निकष पूर्ण करणा-या नवीन महीला महाविद्यालये- आदिवासी उपयोजना क्षेत्रातील महाविद्यालये, यांना ३ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यास १०० टक्के अनुदान देण्यात यावे.
ई )(२) अनुदानित व विनाअनुदानित महिला महाविद्यालय व आदिवासी उपयोजना क्षेत्रातील महाविद्यालयांना विद्याशाखा, नवीन अभ्यासक्रम, नवीन विषय व जादा तुकडया मंजूर केल्यास त्यांनाही वरील ब,क,ड व इ मधील अनुदानसूत्रा प्रमाणे अनुदान मंजूर केले जाईल.

(२) महाविद्यालयांना १०० टक्को अनुदान देण्यांत येईल, त्याच वर्षापासून ती वेतनेतर अनुदान मिळण्यास पात्र राहतील.

(३) अनुदान तत्वावर आणण्यासाठी प्रचलित विद्यार्थी संख्येची अट राहील तसेच इतर महाविद्यालयासाठी विहीत केलेले विद्यार्थी निकष अनुदान प्राप्त झालेल्या वर्षापूर्वी किमान ३ वर्षे पूर्ण केले असले पाहिजे.

(४) त्यांच्या वर्गासाठी अभ्यासक्रमासाठी तसेच नेमणूक केलेल्या शिक्षक कर्मचा-यासाठी [illegible] निश्चीत असली पाहिजे.

(५) महाविद्यालयीन वर्ग,ग्रंथालय,प्रयोगशाळा,क्रीडांगण इत्यादि सोई [illegible] असल्या पाहिजेत.

६..

(६) संबंधित महाविद्यालयांना व्यवस्थापनाने, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना शासनाने व विद्यापीठांनी विहित केलेल्या सेवाशर्ती व वेतनश्रेण्या लागू केलेल्या असल्या पाहिजेत.

(७) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदलेली असावी.

(८) सदर महाविद्यालयांनी शासनाच्या वेळोवेळी निघालेल्या/निघणा-या आदेशाचे (उदा. विद्यार्थ्यांचा प्रवेश इत्यादी ) काटेकोट पालन करणे आवश्यक आहे.

(९) त्या नवीन महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयांत पहिल्या तीन वर्षात जर विद्यार्थ्यांना किमान सुविधा उपलब्ध करुन दिल्या नाहीत तर त्या महाविद्यालयांला अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

(१०) कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास अनुदान मिळणा-या प्रत्येक तुकडीमध्ये खालील विद्यार्थी संख्येची अट राहील.

| तुकडीचा क्रमांक | शहरी विभागातील मुला-मुलींची महाविद्यालये | ग्रामीण विभागातील मुला-मुलींची महाविद्यालये आणि शहरी विभागातील महिला महाविद्यालये | आदिवासी आणि दुर्गम विभागातील मुला-मुलींची महाविद्यालये आणि ग्रामीण विभागातील महिला महाविद्यालये |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| पहिली | ६० ते १०० | ५० ते १०० | ४० ते ८० |
| दुसरी | १२१ ते २०० | १२१ ते १६० | १२१ ते १६० |
| तिसरी | २२१ ते ३०० | २०१ ते २४० | २०१ ते २४० |
| चौथी | ३२१ ते ४०० | २८१ ते ३२० | २८१ ते ३२० |
| पाचवी | ४२१ ते ५०० | ३६१ ते ४०० | ३६१ ते ४०० |
| सहावी | ५२१ ते ६०० | ४४१ ते ५०० | ४४१ ते ५०० |

४) **विधी महाविद्यालयांना अनुदान सूत्र**

प्रचलित अनुदान सूत्रानुसार कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्थापनेपासून पहिल्या ३ वर्षासाठी अनुदान दिले जात नाही. व चवथ्या वर्षापासून २५ टक्के ,पांचव्या वर्षी ५० टक्के, सहाव्या वर्षी ७५ टक्के व सातव्या वर्षापासून १०० टक्के अनुदान दिले जाते. सदर अनुदान सूत्रानुसार जी महाविद्यालये पूर्वी चालू होती ती विधी महाविद्यालये १०० टक्के अनुदानासाठी १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून अनुदानासाठी पात्र ठरतील. अशा महाविद्यालयांना १९९५-९६ या शैक्षणिक वर्षाच्या पूर्वी अनुदानापोटी कोणतीही थकबाकी मिळणार नाही.



Scanned with CamScanner

इतर महाविद्यालयासाठी अनुदानाकरिता जे विहीत निकष आहेत त्या व्यतिरिक्त खालील निकषही विधी महाविद्यालयाना अनुदान देण्यासाठी लागू राहतील.

(अ) संबंधित विधी महाविद्यालयास शासनाची मान्यता आहे.

आणि किंवा

संबंधित विधी महाविद्यालयास "बार कौन्सिल ऑफ इंडिया "ची मान्यता आहे.

(ब) संबंधित विधी महाविद्यालयास विद्यापीठाशी संलग्नित आहे आणि विद्यापीठ/शासन यांनी विहित केलेल्या प्रमाणकांची पूर्तता केली आहे.

(क) सदर विधी महाविद्यालये मान्यता,संलग्नता देणा-या प्राधिकरणांनी शिक्षक, कर्मचारी वर्ग यांचे सेवा प्रवेश,सेवाशर्ती,पाठयक्रम, शिक्षकांचा दर्जा व शिस्त यासंबंधी विहित केलेल्या व इतर सर्व नियम आणि विनियमांचे पालन करत असतील.

(ड) विधी शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठे, बार कौन्सिल ऑफ इंडिया, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व तत्सम मंडळाचे मार्गदर्शन घेऊन विधी महाविद्यालयांतील सोयी सुविधा राखल्या जातील.

५) शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, पुणे व सहसंचालक,उच्च शिक्षण संबंधित विभागीय विभाग यांनी विहित केलेल्या विवरणपत्रात प्रत्येक महाविद्यालयानी आवश्यक माहिती शासनास सादर करणे बंधनकारक राहिल.

६) शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण हे महाविद्यालयाना वरील आदेशातील अटी व तरतूदीनुसार अनुदान मंजूर करतील. मात्र अनुदाना पोटी देण्यात येणारी रक्कम प्रत्येक वर्षी त्यासाठी करण्यांत आलेल्या तरतूदीपेक्षा जास्त असणार नाही.

७) या प्रीत्यर्थ होणारा खर्च पुढे दिलेल्या अर्थशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१. २२०२-सर्वसाधारण शिक्षण-०३-विद्यापीठे व उच्च शिक्षण-अशासकीय महाविद्यालयांना सहाय्य -अशासकीय वाङःमय ,विज्ञान, विधी व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान

२. २२०२-सर्वसाधारण शिक्षण-०२ माध्यमिक शिक्षण -१०५ शिक्षण प्रशिक्षण-अशासकीय शिक्षण शास्त्र महाविद्यालयांना सहाय्य

८) हे आदेश स्वतंत्र स्वरुपाचे नसून यापूर्वी निर्गमित करण्यांत आलेल्या आदेशांचे केवळ एकत्रितकरण आहे. त्यामुळे या आदेशां संदर्भात काही शंका किंवा संदिग्धता उपस्थित झाल्यास त्याचे निरसन संबंधित [illegible] करण्यांत येईल. [illegible] संचालक (उच्च शिक्षण ) व सर्व विभागीय सह संचालक [illegible] घ्यावी.

. . C. .

Scanned with CamScanner

॥ ८ ॥

१)    हे एकत्रित आदेश वित्त विभागाच्या सहमतीने संदर्भाधीन शासन निर्णयास त्या विभागाने वेळोवेळी दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यांत आले आहेत. वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ खालील प्रमाणे आहेत.

१) प्र.क्र.२३४९/७९/एक्सपी-५, दिनांक २७ सप्टेंबर,१९७९
२) प्र.क्र.२२७५/८८/व्यय-५, दिनांक १४ डिसेंबर,१९८८
३) प्र.क्र१२५/९१/व्यय-५, दिनांक १८ जुलै,१९९१
४) वित्त विभागाने व राज्य मंत्रिमंडळाने दिनांक २७ डिसेंबर १९९५ रोजी दिलेली मान्यता.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( म. अ. सरपोतदार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपाल आणि कुलपती यांचे सचिव,राजभवन, मुंबई

शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे
शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे
विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/जळगांव/कोल्हापूर/नांदेड
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
निवासी लेखा अधिकारी,मुंबई
सर्व कोषागार अधिकारी,
कुलसचिव,सर्व कृषितर विद्यापीठे
प्राचार्य सर्व अशासकीय संलग्नित महाविद्यालये
विभागातील सर्व कार्यासने
सामान्य प्रशासन विभाग
वित्त विभाग- सेवा-४

Scanned with CamScanner

अकृषि विद्यापीठाशी संलग्नित
महाविद्यालयातील प्राचार्यांना
अध्यापनाचा कार्यभार देण्याबाबत......

# महाराष्ट्र शासन,

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०११/(४०४/११)-विशि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ ऑक्टोबर,२०११.

**वाचा :-**

१) शासन निर्णय शिक्षण व रोजगार विभाग क्र.एनजीसी २०८०/१६०२८४/(५९८७)-युनि-२,दि.१ सप्टेंबर,१९८१.
२) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र.F-3.1/2009, दिनांक ३० जून, २०१०.
३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(२५/११)-विशि-१, दि.१५ फेब्रुवारी, २०११.
४) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(५७/११)-विशि-१, दि.१५ मार्च, २०११.

**प्रस्तावना :-** राज्यातील अकृषि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक १ सप्टेंबर, १९८१ च्या शासन निर्णयान्वये किमान घड्याळी ४ तासांचा कार्यभार देण्यात आलेला होता. तथापि, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमध्ये प्राचार्यांना अध्यापनाचा कार्यभार देण्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नसल्यामुळे संदर्भाधीन के.३ येथील दि.१५ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयान्वये प्राचार्यांना अध्यापनाच्या विवक्षित कार्यभारातून सूट देण्यात आलेली होती. त्यानंतर संदर्भाधीन क्र.४ येथील दिनांक १५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये प्राचार्यांना पर्यावरण विषयामध्ये अध्यापन करण्याची ऐच्छिक मुभा ठेवण्यात आलेली होती.

२. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारातून सूट देण्यात आल्यामुळे त्यांच्या हिश्श्याचा कार्यभार महाविद्यालयात कार्यरत असलेल्या अर्धवेळ शिक्षकांच्या कार्यभारात वर्ग करुन अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ शिक्षक करण्याची मागणी होत आहे. प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारापासून सूट देऊन त्यांचा कार्यभार अर्धवेळ शिक्षकांमध्ये वर्ग करुन सदर शिक्षकांना पूर्णवेळ शिक्षकांचा दर्जा देण्याचा हेतू नव्हता. अशा प्रकारे अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ शिक्षक केल्यास त्याचप्रमाणे प्राचार्यांचा अध्यापनाचा कार्यभार इतर शिक्षकांना शिकविण्यासाठी नियुक्त केल्यास शासनाला अनावश्यक अतिरिक्त आर्थिक भार सोसावा लागेल.

३. त्याचप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम २(३४) मध्ये अध्यापकाची व्याख्या स्पष्ट केलेली असून, त्यामध्ये प्राचार्यांचा समावेश आहे. प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारातून सूट दिल्यामुळे



Scanned with CamScanner

त्यांच्यावर केवळ प्रशासकीय स्वरुपाची जबाबदारी राहते. अधिनियमातील उक्त तरतूदीनुसार प्राचार्य हे पद अध्यापक संज्ञेत मोडत असल्यामुळे त्यांच्यावर अध्यापनाची जबाबदारी असणे क्रमप्राप्त आहे. प्राचार्यांना अध्यापनाच्या जबाबदारीतून सूट देणे, ही बाब अधिनियमातील उक्त तरतूदीशी विसंगत होईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार विद्यापीठातील विविध अभ्यासमंडळे, समित्या, परिषद व इतर प्राधिकरणावर नियुक्ती करण्यासाठी अध्यापनाचा अनुभव आवश्यक असतो. प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारातून सूट दिल्यास उक्त प्राधिकरणावरील नियुक्तीसाठी वंचित रहावे लागेल. वरील सर्व बाबी विचारात घेता, प्रार्चायांना अध्यपनाच्या कार्यभारामधून देण्यात आलेली सूट रदृद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

४. वरील सर्व बाबी विचारात घेऊन शासन याद्वारे पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

(i) संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक १५-२-२०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ मध्ये प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारापासून देण्यात आलेली सूट रद्द करण्यात येत आहे.

(ii) प्राचार्यांना किमान घड्याळी ४ तासाचा अध्यापनाचा कार्यभार अनिवार्य करण्यात येत आहे.

(iii) प्राचार्यांना पर्यावरण, फाऊंडेशन कोर्स व तत्सम विषय शिकविण्याची मुभा असेल.

(iv) प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारातून सूट दिल्यामुळे त्यांचा कार्यभार इतर शिक्षकांना वर्ग करुन अर्धवेळ शिक्षकास पूर्णवेळ किंवा नवीन अर्धवेळ शिक्षक निर्माण करण्यास विभागीय सह संचालकांनी त्यांच्या स्तरावर मान्यता दिली असल्यास अशी मान्यता तात्काळ रद्द समजण्यात यावी.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१११०१९११२५३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
६) महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई
७) महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) नागपूर
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी



Scanned with CamScanner

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे-१
21 MAY 2001
आवक क्रमांक ३९२४
शाखा

क्रमांक: एनजीसी-१२०१(२८/०१)/विशि-४
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

दिनांक : १९.५.२००१

प्रति
कुलसचिव
सर्व विद्यापीठे

**विषय : शिक्षकीय पदांच्या कार्यभाराबाबत..**

महोदय,

शासन निर्णय दिनांक ११.१२.१९९९ अन्वये विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकीय पदांचा कार्यभार निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार अधिव्याख्यात्यास आठवड्याला घड्याळी १६ तास व प्राध्यापक-प्रपाठक पदांना आठवड्याला १४ तास कार्यभार आहे. आपणास विनंती की, शिक्षकीय पदांची निर्मिती करताना व रिक्त पदे भरताना आपले प्रस्ताव सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शासनास सादर करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
—सही/—
(अ.मा.भद्दुलवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :
विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षक पदांसाठी विभागप्रमुख, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अग्रेषित.
[illegible]

## प्रमाणपत्र

शासन निर्णय क्र.एनजीसी-१२९८/(४६१९)/विशि-४, दि.११ डिसेंबर,१९९९ मधील परिच्छेद २० मधील तरतुदीनुसार पूर्णवेळ अधिव्याख्याता / अधिव्याख्याता (वरिष्ठ श्रेणी) / अधिव्याख्याता (निवड श्रेणी) यांना १६ घड्याळी तासांचा कार्यभार विहीत करण्यात आला आहे तो ४८ मिनिटांच्या २० तासिकांमध्ये विभागण्यात आलेला आहे. आणि शासन निर्णय क्र.शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एनजीसी २०८०/१०८२८४/(५९८७)/विशि-२, दि. १ जून,१९८१ व समक्रमांकित शासन निर्णय दि.१ ऑक्टोबर,१९८१ प्रमाणे शिक्षक वर्गाला अनुज्ञेय असणारी कार्यभारातील सूट विचारात घेऊन तसे [illegible] वेळापत्रक तयार केले असून अनुदानित कार्यभाराची विभागणी केली असता खालील विषयांची शिक्षक पदे रिक्त आढळून येत आहेत :-

| अ.क्र. | विषयाचे नाव | कार्यभार | | भरलेली पद | | | रिक्त पदांचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सिअरी | प्रात्यक्षिक | पूर्णवेळ | अर्धवेळ | तासिका तत्वावर | पूर्णवेळ | अर्धवेळ | तासिका तत्वावर |
| १. | २. | ३. | | ४. | | | ५. | | |
| | | | | | | | | | |

महाविद्यालयामध्ये शिकविल्या जाणा-या प्रत्येक विषयाकरीताच्या शेवटच्या पूर्णवेळ अधिव्याख्यात्याच्या अनुमानावर असलेल्या विषयाच्या कार्यभाराची विभागणी केल्यानंतर शेवटच्या संरक्षित (Protected) अधिव्याख्यात्याकडे त्यांच्या त्या विषयाकरीता [illegible] कार्यभार [illegible] आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शेवटच्या पूर्णवेळ अधिव्याख्यात्याचे पूर्णनाव | नियुक्ती दिनांक (पूर्णवेळ पदावरील) | विषयाचे नाव | उपलब्ध कार्यभार |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| | | | | |

वरील माहिती मी स्वतः तपासून तयार केली आहे असे प्रमाणित करतो.

स्थळ : प्राचार्य

दिनांक : महाविद्यालय

Scanned with CamScanner

परिपत्रक/तातडीचे

क्रमांक: एनजीसी/२००१/३१२७८/कार्यभार/१२१/
मशि-१. ८०८६
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

दिनांक :- २३/५/२००१.

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

विषय :- विहित पदांच्या कार्यभाराबाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्र. एनजीसी/१२०१/[९९/०१]/मशि-४.
दिनांक १९.५.२००१.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन शासन पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सुलभ संदर्भाकरिता त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे विषयनिहाय कार्यभार तथा मंजूर शिक्षक पदे व रिक्त पदांचा तपशील शेवटच्या पूर्णवेळ अधिव्याख्यात्यास उपलब्ध असलेल्या अनुदानित कार्यभाराचा तपशील शासनाने विहित केलेल्या प्रपत्रात नमूद करुन विहित प्रमाणपत्रासह (प्राचार्यांच्या सहीने) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत संचालनालयास दोन प्रतीमध्ये सादर करावयाचा आहे. व त्याची एक प्रत आपल्याकडे ठेवावी.

शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२९८/(७६१२)/युनिअाय-४, दिनांक ११.१२.९९ मधील अनुक्रमांक २० मध्ये महाविद्यालयीन शिक्षकांचे कार्यभाराबाबी नमूद असलेला तपशील विचारात घेऊन महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना संबंधित विषयाचा कार्यभार द्यावयाचा आहे. महाविद्यालयातील पूर्ण वेळ अधिव्याख्यात्याकरिता कार्यभार पुढीलप्रमाणे विहित करण्यात आलेला आहे.

१) महाविद्यालयीन अधिव्याख्याता/वरिष्ठ अधिव्याख्याता/निवडश्रेणी अधिव्याख्याता यांना १६ घड्याळी तास म्हणजेच ९६० मिनिटांचा कार्यभार आवश्यक आहे. म्हणजेच ४८ मिनिटांच्या २० तासिका असणे आवश्यक आहे.

२) महाविद्यालयीन अधिव्याख्यात्याकरिता शासन निर्णय दिनांक १ जुन १९८१ व दिनांक १ सप्टेंबर, ८१ प्रमाणे कार्यभारात अनुज्ञेय असणारी सूट विचारात घेऊन महाविद्यालयांनी वेळापत्रक तयार करणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील विभाग

.. २ ..

प्रमुखास २ तासिका उपप्राचार्यांना २ तासिका. पी. एच. डी. मार्गदर्शक २ तासिका पदव्युत्तर शिक्षकांसाठी २ तासिका मात्र ही सूट सहा तासिकेपेक्षा अधिक होणार नाही. याची दक्षता घ्यावी. याप्रमाणे कार्यभाराचे वाटप करून महाविद्यालयांनी संबंधीत विषयाच्या रिक्त पदा संबंधीचा प्रस्ताव तीन प्रतीमध्ये संबंधीत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचे कार्यालयास सादर करावयाचा आहे. याकरिताच्या सूचना विभागीय स्तरावरून सर्व संबंधीत अशासकीय महाविद्यालयांना तात्काळ कळविण्यांत याव्यांत.

वरीलप्रमाणे महाविद्यालयाकडून विभागीय कार्यालयात प्रस्ताव प्राप्त होताच त्यांची सखोल तपासणी/छाननी करून माहिती तपासून ती बरोबर असल्याचे "प्रमाणपत्र" त्यांचे स्वाक्षरीसह प्रस्तावात नमूद करून संचालनालयास त्याच्या स्पष्ट शिफारशीसह ३० मे पर्यंत दोन प्रतीमध्ये सादर करावयाचे आहेत.

स्वाक्षरित शिक्षण सह संचालक
(उच्च शिक्षण) यांनी मान्य केले आहे.

शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.
खरी नक्कल

अराकुं/२३४०१

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळेसंदर्भात आदेश

कृषि विद्यापीठे व संलग्न अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: एमसीसी १०९२/(२६२६)/विशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २८ सप्टेंबर, १९९५.

शासन निर्णय:- महाराष्ट्र कृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये प्रमाणसंहिता ( शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक शर्ती व अटी) नियम १९८४ मधील नियम क्रमांक १० अन्वये कृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कामाचे तास व उपस्थिती हे ठरवून देण्यात आले आहेत. त्यानुसार वर्ग १,२ व ३ च्या कर्मचाऱ्यांना आठवड्याचे ३८ १/२ तास व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना आठवड्याचे ४० तास भोजनाची सुट्टी धरून ठरवून देण्यात आले आहे.

२. कृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामाचे तास शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासाप्रमाणे असावेत ही कर्मचारी महासंघाची मागणी काही काळ शासनाच्या विचाराधीन होती. यावर आता विचार होऊन शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

कृषि विद्यापीठे व संलग्न अशासकीय महाविद्यालयांतून काम करणाऱ्या

(अ) वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांसाठी आठवड्याचे कामाचे एकूण तास ४२

(ब) वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांसाठी आठवड्याचे कामाचे एकूण तास ४६

वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यालयीन वेळेत भोजनाची सुट्टी अर्ध्या तासाची राहील.

३. या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे दुसऱ्या व चौथ्या शनिवारी पूर्ण सुट्टी द्यावी किंवा दर शनिवारी अर्धवेळ अर्धा दिवस चालू ठेवावे, याबाबतचा निर्णय संबंधित विद्यापीठांनी महाविद्यालयांशी चर्चा करुन घ्यावयाचा आहे. मात्र दर आठवड्याला कामाच्या तासांची वर दिल्याप्रमाणे संख्या राहील याची त्यांनी खबरदारी घ्यावयाची आहे.

४. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये प्रमाणसंहिता ( शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक शर्ती व अटी) नियम १९८४ मधील नियम १० मध्ये तदेव

कृ.मा.प.

6/1/96

Inward No. 556 Date 5-1-96

Principal

प्रमाणे सुधारणा करण्याचे आदेश उपरोक्त स्वाक्षरी [illegible] महिन्यात देतील.

५. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे व कुलसचिव, सर्व कृषिविद्यापीठे, यांना विनंती की, हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास त्वरित आणून द्यावेत.

हे आदेश सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १९५/सेवा-५ व ४०४/९५/सेवा-९, दि.३१.१.१९९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि.ह.सेन )
[illegible], महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल व कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ( ५ प्रती )
सर्व विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल ( लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरु
सर्व कृषि विद्यापीठांचे कुलसचिव
सर्व अशासकीय महाविद्यालये ( शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना प्रती पाठवाव्यात.)
सामान्य प्रशासन विभाग ( का. १८ ( र.व.का.), मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री/राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, विशि-४

जा.क्र.शिसंसं/वेतन अनुदान/पुणे
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
पुणे विभागीय कार्यालय
पुणे-४११००१.
दिनांक- 28 1995

प्राचार्य/प्राचार्या. अशासकीय कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे पुणे/नाशिक/अहमदनगर यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभागीय कार्यालय करिता
पुणे-४११००१.

राज्यातील अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालयांमध्ये विषयांसाठी विद्यार्थी संख्या ..

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक एनजीसी १०९८/वि.संख्या/(४०१/९८)/मशि-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ मार्च, १९९९.

वाचा : १) शासन पत्र क्र. एनजीसी २३८१/११४९८३/(६७५४)/विशि-२, दि १ जून १९८२
२) शासन परिपत्रक क्र. एनजीसी ३५९३/५७४३/विशि-२, दि. २४ सप्टें., १९९३
३) शासन निर्णय क्र. एनजीसी १०९३/(५९१८)/मशि-३, दि. १९ जून, १९९५
४) संचालक (उच्च शिक्षण) यांचे क्र. एनजीसी-१९९८/अनुदान/मवि-२/अ, दि. १.१२.९८ चे पत्र.

<u>प्रस्तावना</u> : अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील तुकडया मंजूर करताना त्यामधील विद्यार्थी संख्येबाबत पाळावयाचे निकष दिनांक १९ जून, ९५ च्या शासन निर्णयान्वये निर्धारित केले असून याच शासन आदेशामध्ये पदवी स्तरावरील ऐच्छिक व विशेष स्वरुपाच्या विषयांसाठी विद्यार्थी संख्या किती असावी, याबाबतही निकष निर्धारित केला आहे. या आदेशात निर्धारित केलेल्या निकषानुसार पदवी स्तरावरील ऐच्छिक व विशेष स्वरुपाच्या विषयांसाठी शहरी भागाकरिता २४ व ग्रामीण भागाकरिता १० असा विद्यार्थी संख्येचा निकष विहित केला आहे.

२. शासनाने दि. १९ जून, ९५ रोजी या संबंधात निर्गमित केलेले आदेश हे शैक्षणिक वर्ष १९९५-९६ पासून लागू करण्यात आलेले आहेत. तथापि, या शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना विभागीय सहसंचालकांकडून सन ९५-९६ या शैक्षणिक वर्षापूर्वी काही महाविद्यालयांमध्ये पदवी स्तरावर विशेष व ऐच्छिक स्वरुपाच्या सुरु करण्यात आलेल्या विषयांनाही सदर आदेशातील तरतुदी लागू करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषतः शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व पुणे विद्यापीठ क्षेत्रातील महाविद्यालयांबाबत ही बाब प्रकर्षाने जाणवते.

३. सन १९९५-९६ या शैक्षणिक सत्रापूर्वी राज्यातील ज्या अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये पदवी स्तरावर ऐच्छिक व विशेष स्वरुपाचे विषय सुरु करण्यात आले आहेत, त्या विषयांना अनुदान मंजूर करताना विभागीय सहसंचालक दि. १९ जून, ९५ चे आदेशातील तरतुदी लागू करीत असल्याने सदर महाविद्यालयांच्या व्यवस्थापनामध्ये



Scanned with CamScanner

असलेला असंतोष दूर करण्याच्या दृष्टीने तसेच, या संदर्भात कार्यवाही करताना राज्य स्तरावर एकवाक्यता व सूसुत्रता राहावी, या दृष्टीकोनातून दिनांक १९ जून, ९५ च्या आदेशातील काही तरतुदींबाबत स्पष्टीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : प्रस्तावनेत वर विशद केलेली पार्श्वभूमी विचारात घेऊन, दिनांक १९ जून, ९५ च्या शासन निर्णयातील तरतुदींसंदर्भात खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

१) शासनाने दि. १९ जून, ९५ च्या शासन निर्णयान्वये जे आदेश निर्गमित केले आहेत, ते सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात आले असल्याने त्यापूर्वी राज्यातील अशासकीय महाविद्यालयांमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये पदवी स्तरावर पूर्वपरवानगीने ऐच्छिक व विशेष स्वरुपाच्या सुरु करण्यात आलेल्या विषयांना संदर्भाधीन दि. १ जून, ८२ च्या पत्राने निर्धारित करण्यात आलेले निकषच लागू राहतील. म्हणजेच, शहरी भागाकरिता १५ व ग्रामीण भागाकरिता ५ असा प्रथम वर्षी विद्यार्थी संख्येचा निकष लागू राहील. ज्या महाविद्यालयांमध्ये सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून पदवी स्तरावर विशेष किंवा ऐच्छिक स्वरुपाचे विषय सुरु केलेले आहेत, त्या महाविद्यालयांनी मात्र सन १९९५-९६ पासून पुढे त्यांच विषयांसाठी दिनांक १९ जून, ९५ च्या आदेशातील तरतुदींनुसार विहित विद्यार्थी संख्येचा निकष म्हणजे, शहरी भागाकरिता २४ व ग्रामीण भागाकरिता १० असा प्रथम वर्षीविद्यार्थी संख्येचा निकष पूर्ण करणे बंधनकारक राहील.

टीप :- शहरी भाग म्हणजे जेथे 'अ' / 'ब' वर्ग नगरपरिषद किंवा महानगरपालिका अस्तित्वात असलेले क्षेत्र व ग्रामीण भाग म्हणजे जेथे ग्रामपंचायत किंवा 'क' वर्ग नगरपारिषद कार्यरत आहे असे क्षेत्र.

२) तसेच, महिला महाविद्यालयांसाठी (जरी ही महाविद्यालये शहरी भागात असली तरीही) व आदिवासी विभागातील महाविद्यालयांसाठी पदवी स्तरावरील विशेष व ऐच्छिक स्वरुपाच्या विषयांना किमान १० विद्यार्थी संख्येचा निकष विहित करण्यात येत आहे.

३) तसेच, अनुदान निर्धारणाच्या दृष्टीने ज्या महाविद्यालयातील नवीन विषय जून १९९५ पूर्वी शासन मान्यतेने सुरु झाले आहेत व ती महाविद्यालये जुन्या निकषाप्रमाणे ३ वर्षासाठी विद्यार्थी संख्येची अट पूर्ण करीत असतील तर त्यांना [illegible] वर्षी २५ टक्के अनुदान मंजूर करण्यात येईल. जून १९९५ नंतर पुढील टप्प्यातील ५० टक्के, ७५ टक्के व १०० टक्के अनुदान मंजूर करण्यासाठी सुधारित निकषाप्रमाणे अनुक्रमे चौथ्या, पांचव्या व सहाव्या वर्षी विद्यार्थी संख्या प्रथम वर्षी असणे आवश्यक राहील. हे

..३/-

Scanned with CamScanner

आदेश निर्गमित होण्यापूर्वी एखाद्या प्रकरणात जुने निकष पूर्ण झाले आहेत म्हणून संबंधित सहसंचालकांनी नवीन निकष (म्हणजे, दिनांक १९ जून, १९९५ चे निकष) पूर्ण न करता संबंधित महाविद्यालयाला अनुदान मंजूर केले असल्यास अशा प्रकरणात मात्र वसुली करण्याची आवश्यकता राहणार नाही.

४) वरील परिच्छेद ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या महाविद्यालयांनी अद्यापि नवीन निकष पूर्ण करीत नाहीत आणि ज्या महाविद्यालयांना यापूर्वी अनुदान मंजूर करण्यात आले आहे त्या महाविद्यालयांना प्रथम वर्षी विद्यार्थी संख्या नवीन निकषाप्रमाणे पोहोचण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षासहित तीन वर्षांकरिता अर्थात जून २००१ पर्यंत कालावधी दिला जाईल. हा कालावधी संपल्यावर अर्थात शैक्षणिक वर्ष २००१-२००२ मध्ये नवीन निकषाप्रमाणे प्रथम वर्षी ते विद्यार्थी संख्या मिळवू शकले नाहीत तर त्या वर्षापासून अनुदानाकरिता पूर्णपणे अपात्र ठरतील.

५) शैक्षणिक वर्ष सन १९९५-९६ व तद्नंतर सुधारित निकषानुसार परवानगी दिलेल्या विषयांना नवीन निकषाप्रमाणे विद्यार्थी संख्या उपलब्ध असेल तरच टप्प्याटप्प्याने अनुदान देय होईल.

२. सदर शासन निर्णयातील सूचना सर्व विद्यापीठांनी त्यांच्या अधिक्षेत्रात असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या जाणीवपूर्वक निदर्शनास आणाव्यात व त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत संबंधितांना कळवावे.

महाराष्ट्राचे राज्यपालांच्या आदेशानुसार व नांवाने.

(म. अ. सरपोतदार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
कुलसचिव, सर्व विद्यापीठे
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), मुंबई, पुणे, कोल्हापूर, जळगांव, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अमरावती.
उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व उप सचिव, अवर सचिव व कार्यासन-अधिकारी.
निवड नस्ती / मशि-३

Scanned with CamScanner

अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालयातील तुकड्या मंजूर करतांना
त्यामधील विद्यार्थी संख्येबाबत पाळावयाचे निकष.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक-एनजीसी-१०९३/[५९१८]/मशि-३
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई- ४०० ०३२.

दिनांक - १९ जून, १९९५.

पहा :- १] शासन पत्र शिक्षण व सेवायोजन विभाग
क्रमांक - युएमएफ-१०८२/१२६०३५/[६९३५]/विशि-२
दिनांक- २८ नोव्हेंबर, १९८४.
२] शासन परिपत्रक, उच्च व तंत्रशिक्षण आणि. सेवायोजन विभाग
क्रमांक-एनजीसी-३५९३/[५७४३]/विशि-२,
दिनांक - २४ सप्टेंबर, १९९३.
३] शिक्षण संचालक [उ. शि.] महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे
पत्र क्र. एनजीसी-१०९४/तुकड्या/९-अ, दि. ७. २. ९५

प्रास्ताविक :- राज्याचा शैक्षणिक विकास झपाट्याने होत असून प्रतिवर्षी मोठ्या संख्येने नवीन महाविद्यालये सुरु होत असून विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेवून नवीन विषय, नवीन तुकड्या यांना परवानगी देणे भाग पडत आहे. अतिरिक्त तुकड्यांना मंजूरी देण्याचा प्रश्न हा जरी प्रथम विद्यापीठाच्या कक्षेतील होता, तरी तो अनुदानांशी निगडीत असल्यामुळे अशासकीय, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये अतिरिक्त तुकड्या मंजूर करतांना महाविद्यालयांनी खालीलप्रमाणे अटी पूर्ण केल्याची खात्री विद्यापीठांनी करणे आवश्यक असल्याचे शासन पत्र, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. युएमएफ-१०८२/१२६०३५/[६९३५]/विशि-२ दि. २८ नोव्हेंबर, १९८४ अन्वये निर्देशित करण्यात आले आहे. :-

१] तुकडीच्या प्रवेश क्षमतेपेक्षा प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४०% नी जास्त असावी. [उदा. जर प्रवेश क्षमता १०० असेल व विद्यार्थी संख्या १४० होत असेल तर दुसरी तुकडी उघडण्यास हरकत नसावी.]

२] अतिरिक्त तुकडी सुरु केल्यानंतर अतिरिक्त शिक्षकांची नियुक्ती कार्यभारानुसार करावी.

३] अतिरिक्त तुकडीकरिता आवश्यक त्या सर्व सुविधा महाविद्यालयाकडे उपलब्ध असाव्यात.



Scanned with CamScanner

४] महाविद्यालय ज्या ठिकाणी असेल त्या शहरातील-गावातील महाविद्यालयाच्या वर्गाच्या विशिष्ट शाखेची कमाल प्रवेश क्षमता संपलेली असावी.

नवीन महाविद्यालये देतांना विद्याशाखा निहाय विद्यार्थी संख्येचे निकष कोणते असावेत याबाबत शासन परिपत्रक, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. एनजीसी-३५९३/[५७४३]/विशि-२, दि. २४. ९. १९९३ अन्वये निदेश देण्यात आले असून ते खालीलप्रमाणे आहेत :-

| | विभाग | विद्यार्थी संख्येचे निकष |
|---|---|---|
| १] | शहरी | ६० |
| २] | आदिवासी | ४० |
| ३] | ग्रामीण | ५० |
| ४] | महिला | ५० |

याशिवाय ग्रामीण भाग [जिल्हा परिषद क्षेत्र] यामध्ये संबंधित प्रत्येक विषयात पदवी स्तरावर किमान २४ विद्यार्थी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता किमान १६ विद्यार्थी उपलब्ध असणे आवश्यक असल्याचेही सदर शासन परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आलेले आहे. तसेच शासन पत्र क्र. एनजीसी-२०८६/[३३५]/विशि-२ अ दिनांक-१८-११-१९८७ अन्वये ज्या शहराची वस्ती ५०,००० पेक्षा कमी आहे अशा ठिकाणी किमान विद्यार्थ्यांची संख्या १० अशी शिथिल करण्यात आलेली आहे.

## शासन निर्णय

प्रस्ताविकामध्ये उल्लेख केलेल्या शासन पत्राद्वारे तुकड्यांमधील विद्यार्थी संख्येबाबत शासनाने निदेश दिलेले असले तरी असे दिसून आले आहे की, निरनिराळ्या विद्यापीठ क्षेत्रामधील अशासकीय महाविद्यालयांमधील तुकड्यांमध्ये विद्यार्थी संख्येच्या बाबतीत एकसूत्रता नाही आणि त्यामुळे अनुदान मंजूर करतांना अडचणी निर्माण होत आहेत. तसेच शासनावरील खर्चात अकारण वाढ सोसावी लागत आहे. सदर परिस्थितीत राज्यातील अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमधील तुकड्यांमध्ये विद्यार्थी संख्येचे निकष निर्धारित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन आता या निर्णयाद्वारे राज्यातील अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये प्रत्येक तुकडीमध्ये किती विद्यार्थी संख्या असावी याबाबतचे परिमाण/निकष खालीलप्रमाणे मंजूर करीत आहे. :-

Scanned with CamScanner

| तुकडीचा क्रमांक | शहरी विभागातील मुला-मुलींची महाविद्यालये | ग्रामीण विभागातील मुला-मुलींची महाविद्यालये आणि शहरी विभागातील महिला महाविद्यालये | आदिवासी आणि दुर्गम विभागातील मुला-मुलींची महाविद्यालये आणि ग्रामीण विभागातील महिला महाविद्यालये |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| पहिली | ६० ते १०० | ५० ते १०० | ४० ते ८० |
| दुसरी | १२१ ते २०० | १२१ ते १६० | १२१ ते १६० |
| तिसरी | २२१ ते ३०० | २०१ ते २४० | २०१ ते २४० |
| चौथी | ३२१ ते ४०० | २८१ ते ३२० | २८१ ते ३२० |
| पाचवी | ४२१ ते ५०० | ३६१ ते ४०० | ३६१ ते ४०० |
| सहावी | ५२१ ते ६०० | ४४१ ते ५०० | ४४१ ते ५०० |

३. वरील निकषांबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, पहिल्या तुकडीसाठी जी विद्यार्थी संख्या ठरविण्यात आली आहे, उदा. शहरी भागासाठी पहिल्या तुकडीसाठी ६० ते १०० अशी जी विद्यार्थी संख्या ठरविण्यात आली आहे ती त्या विभागामध्ये कला, विज्ञान व वाणिज्य यापैकी कोणत्याही विद्याशाखेच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी असून ६० पेक्षा कमी विद्यार्थी असल्यास सदर तुकडी उघडता येणार नाही, आणि उघडल्यास ती अनुदानास पात्र राहणार नाही. तसेच दुसरी तुकडी उघडण्यासाठी कमीत कमी १२० च्या वर विद्यार्थी संख्या असल्याशिवाय दुसरी तुकडी उघडता येणार नाही, व उघडल्यास ती अनुदानास पात्र राहणार नाही.

४. पदवी स्तरावर तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रत्येक विषयासाठीची किमान विद्यार्थी संख्या पूर्वीच्याच अटीप्रमाणे म्हणजेच अनुक्रमे २५ व १६ अशी राहील मात्र आदिवासी आणि दुर्गम विभागातील मुलामुलींची महाविद्यालये आणि ग्रामीण विभागातील आणि ५०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरातील महिला महाविद्यालये यांच्या बाबतीत ही संख्या किमान १० विद्यार्थी/विद्यार्थिनी अशी राहील.

५. सदर शासन निर्णयानुसार कृषितर विद्यापीठे व अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांनी नवीन तुकड्या उघडण्यापूर्वी/प्रस्ताव सादर करतांना आवश्यक ती दक्षता घ्यावी व सदर निकषाचे काटेकोरपणे पालन करावे.

Scanned with CamScanner

६. विना अनुदान/कायम विना अनुदान महाविद्यालयांनाही वरीलप्रमाणे तुकड्यांचे निकष लागू असतील. मात्र त्यांना ज्या तत्वावर शासनाकडून परवानगी देण्यात आलेली असेल त्या तत्वावरच सदर तुकड्यांच्या लागतील.

७. सदर शासन निर्णयानुसार तुकड्यांमधील विद्यार्थी संख्येचे निकष १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-xxxxx
[त्रिं. ब. सेन]
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति-
शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
सर्व कुलसचिव, कृषितर विद्यापीठे,
सर्व अशासकीय/विना अनुदान/कायम विना अनुदान महाविद्यालये, [संचालकांमार्फत]
निवड नस्ती-मशि-३४.

निअ./-

"अंतरी पेटवू ज्ञानज्योत"
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

जा.क्र. उमवि/९५/५/शै. ५/६६५८ दिनांक :- ५.९.९५

प्रत माहितीस्तव :-
१] उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य तथा मान्यताप्राप्त संस्थांचे मा. संचालक
२] उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभागाचे मा. विभाग प्रमुख
३] उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सर्व प्रशासकीय विभागाचे मा. विभाग प्रमुख.

आपला विश्वासू
धनराज पाटील
उपकुलसचिव

......

Scanned with CamScanner

अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य व
शिक्षणशास्त्र महाविद्यालये
शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा आकृतिबंध

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.एनजीसी-१२९९/(४७९५)/विशि-४
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २६ ऑगस्ट, १९९९

वाचा : १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.युसेवि क्रमांक एनजीसी-१२८०/१५०१६३/३२ सेल, दि.२२ फेब्रुवारी १९८०
२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एनजीसी-१२८१/५४५/विशि-४, दि. २ डिसेंबर १९८५
३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.युसेवि क्र.एनजीसी-१२९६/६७५६३/(४०३७)/विशि-४, दि. ४ मार्च,१९९६

**प्रस्तावना** : विद्यापीठ कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्या कायद्यान्वये विद्यापीठांना दिलेल्या अधिकाराप्रमाणे त्यांनी सलग्नित महाविद्यालयातील निरनिराळ्या संवर्गातील शिक्षकेतर कर्मचा-याच्या सेवाशर्ती विशेषता त्या पदाची शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये, व कार्यभार बाबत अधिनियम करणे आवश्यक होते. परंतु याबाबत कार्यवाही न झाल्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी मागणी केल्याप्रमाणे आणि विशेषता शासनाने महाविद्यालयाना वेतन अनुदान योजना लागू केल्यानंतर सर्व विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयात शिक्षकेतर कर्मचा-यांचा समान आकृतिबंध लागू करणे आवश्यक झाले.

**शासन निर्णय** : संदर्भाधिन शासन निर्णया अन्वये अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी पदांचे मानक ठरवून देण्यात आले आहे. या मानकाच्या आदेशाचे एकत्रिकरण करुन शासन आता खालीलप्रमाणे समान कर्मचारी आकृतिबंध लागू करण्याचे आदेश देत आहे :-

१) **अशासकीय कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये -**

(१) वरील महाविद्यालयात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे खालीलप्रमाणे चार प्रवर्ग राहतील -
अ) प्रशासकीय कार्यालया (मुख्य) साठी लिपीकवर्ग/प्रशासकीय पदे
ब) महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी लागणारे कर्मचारी
क) विज्ञानशाखा असलेल्या महाविद्यालयातील प्रयोग शाळेसाठी लागणारे कर्मचारी
ड) वरील (ब) व (क) सोडून इतर सर्वसामान्य कामासाठी लागणारा वर्ग चार मधील कर्मचारी

(२) महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या, महाविद्यालयातील आर्थिक उलाढाली, इमारत, ग्रंथालय, प्रयोगशाळा याचा सर्व विचार करुन वरील वर्गवारीचा क्रम खालीलप्रमाणे राहील :-

Scanned with CamScanner

**पदाची वर्गवारी**

१) कनिष्ठ लिपीक/टंकलेखक
२) वरिष्ठ लिपीक/वरिष्ठ लेखा लिपीक
३) मुख्य लिपीक/उपलेखापाल
४) अधिक्षक/लेखापाल
५) कुलसचिव

वरील पदाचे वर्गवारी प्रमाणे महाविद्यालयातील (वरिष्ठ व कनिष्ठ विभाग धरून) विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयात अनुज्ञेय असलेल्या कर्मचारी वर्गाची माहिती विवरणपत्र 'अ' मध्ये देण्यात येत आहे. महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी लेखा विषयांचेही कामकाज पहातील. याप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या कर्मचारी वर्गास विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे/विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना या निर्णयाप्रमाणे विद्यार्थी संख्येच्या निकषवारा प्रमाणे पदे मान्य करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

(३) वरील निकषाप्रमाणे लिपीक वर्ग/प्रशासकीय पदे धरुन खालीलप्रमाणे लघुलेखनासाठीही पदे अनुज्ञेय राहतील.

| | | |
|---|---|---|
| १. | ५०० ते १५०० पर्यंत विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालय | पूर्वीचे टंकलेखक पदाचे रुपांतर लघूटंकलेखक पदामध्ये करुन त्यास शासकीय दराने वेतन भत्ते देय राहील. |
| २. | १५०१ ते ३००० पर्यन्त विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालय | कनिष्ठ लघु लेखक पद अनुज्ञेय |
| ३. | ३००० च्या वर विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालय | वरिष्ठ लघुलेखक पद अनुज्ञेय |

२) **महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी आवश्यक कर्मचारी**

प्रत्येक संलग्नित महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणीत व त्यांनी विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेसह ग्रंथालय पद अनुज्ञेय राहिल. (वरिष्ठ व कनिष्ठ स्तरावर) तसेच ग्रंथालयासाठी आवश्यक तांत्रिक व लिपीक वर्ग/चतुर्थश्रेणी वर्ग पदेही खालील प्रमाणे अनुज्ञेय राहतील :-

(१) सहाय्यक ग्रंथपाल - महाविद्यालयात विद्यार्थी संख्या २००० पेक्षा जास्त असेल तर विहीत शैक्षणिक अर्हता धारण करणारे सहाय्यक ग्रंथपालाचे एक पद.

(२) पुरक ग्रंथालय पदे - १००० विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयासाठी २५० विद्यार्थ्यांमागे १ प्रमाणे ग्रंथालय परिचय पदे अनुज्ञेय राहतील. १००० च्या वर विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयातील ग्रंथालयासाठी आवश्यकता असेल तर ग्रंथालय परिचया पैकी एक पद कनिष्ठ लिपीक संवर्गातील असेल.

1905
1750
0155

1750
1905

4 1250
4+1
⑥+1
250
3 1850
24
251
18×6

Scanned with CamScanner

३) **विज्ञान शाखा असलेल्या महाविद्यालयातील प्रयोग शाळेसाठी कर्मचारी -**

विज्ञान विषयाच्या प्रयोगशाळांसाठी प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोग शाळा परिचराची पदे विवरणपत्र 'ब' मध्ये दिल्याप्रमाणे अनुदानास पात्र धरण्यास मंजूरी देण्यात येत आहे. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी यापुढे अनुदान निर्धारण करतांना हे निकष अंमलात आणावे.

४) **इतर सर्वसामान्य कामासाठी चतुर्थश्रेणी पदे -**

(अ) महाविद्यालयाच्या प्राचार्य, शिक्षक तसेच प्रशासकीय कार्यालयासाठी व विद्यार्थ्यांच्या करिक्यलर ॲक्टीव्हीटीसाठीही चतुर्थश्रेणी संवर्गातील पदाची आवश्यकता आहे. त्यासाठी २५० विद्यार्थ्यामागे एक चतुर्थश्रेणी पद अनुज्ञेय राहील. या चतुर्थश्रेणी संवर्गात शिपाई, पहारेकरी, उदवाहक, माळी, स्वच्छक, इत्यादीचा समावेश असेल व महाविद्यालयांनी त्यांच्या सोईप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे नियुक्ती करावी.

(ब) वरील २) ३) व ४) मध्ये दिलेल्या निरनिराळ्या विभागांसाठी कर्मचारी विचारात घेउन ५०० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयात खालीलप्रमाणे वर्ग ४ ची पदे अनुज्ञेय राहतील.

(१) कला शाखा किंवा वाणिज्य शाखा किंवा कला व वाणिज्य शाखा असलेल्या महाविद्यालयात ५०० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असेल तर वरील २)३) व ४) मध्ये दिलेल्या निरनिराळ्या विभागाकरीता अनुज्ञेय असलेल्या पदासह फक्त चतुर्थश्रेणीची ५ पदे अनुज्ञेय राहतील.

(२) विज्ञान शाखा सेह असलेल्या महाविद्यालयात ५०० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असेल तर (परिच्छेद एक मधील) ब) क) व ड) मध्ये दिलेल्या निरनिराळ्या विभागाकरीता अनुज्ञेय असलेल्या पदासह फक्त चतुर्थश्रेणीची ७ पदे अनुज्ञेय राहतील.

५) **अशासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी आकृतिबंध -**

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी आकृतिबंध शिक्षणशास्त्र महाविद्यालयात लागू नाही. त्यासाठी अशासकीय शिक्षण महाविद्यालयांना खालील प्रमाणे समान आकृतिबंध लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

| विद्यार्थी संख्या | कर्मचारी वर्गवारी | पदांची संख्या |
|---|---|---|
| २५० पर्यन्त पदसंख्या असलेली महाविद्यालये | १) मुख्य लिपीक/लेखापाल | १ |
| | २) वरिष्ठ लिपीक/लेखालिपीक | १ |
| | ३) कनिष्ठ लिपीक-टंकलेखक | १ |
| | ४) चतुर्थश्रेणी | ५ |
| | १) ग्रंथपाल (विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणी लागू राहील) | १ |
| | २) ग्रंथालय चतुर्थश्रेणी कर्मचारी | १ |

Scanned with CamScanner

वरील कर्मचाऱ्या व्यतिरिक्त ज्या महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा असेल तेथे एक प्रयोग शाळा सहाय्यक-नि-दृकश्राव्य यंत्र चालक ही पदे अनुज्ञेय राहतील. मात्र त्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांच्या पूर्व संमतीची आवश्यकता राहील.

६) वरील पदांना शासनाने वेळोवेळी मान्य केलेल्या वेतनश्रेणी देय ठरतील.

७) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण हे समान कर्मचारी आकृतिबंधाची अंमलबजावणी करतील व विद्यापीठे/महाविद्यालये/व्यवस्थापने यांना जर काही स्पष्टीकरणे पाहिजे असतील तर प्रसृत करतील. सदरहू बाबतीत शिक्षण संचालक, उच्च शिक्षण आवश्यकता वाटेल तेव्हा शासनाकडून आदेश प्राप्त करून घेतील.

८) याबाबतचा खर्च (१) '२२०२ सर्वसाधारण शिक्षण-०३ विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०४ अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य (एक) (ए) अशासकीय महाविद्यालयांना सहाय्य (एक) बिनसरकारी वाङःमय, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदाने व (२) एक (चार) बिनसरकारी-शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान (ए) सर्वसामान्य परिश्रम अनुदान' या शिर्षाखाली दाखविण्यात यावा.

९) हा शासन निर्णय संदर्भाधिन शासन निर्णयास वित्त विभागाने दिलेल्या सहमतीने व खालील अनौपचारीक संदर्भाने निर्गमित करण्यात येत आहे.

(१) ४३१/इएक्सपी-५ दि.८ फेब्रूवारी, १९८०

(२) ११७०/इएक्सपी-५/८२ दि.२२ जून. १९८२

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(अ.मा.भट्टलवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल व कुलपती यांचे सचिव, राजभवन मुंबई

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद/कोल्हापूर/जळगाव/अमरावती/नांदेड

विभागीय उपसंचालक, बृहन्मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/नाशिक/कोल्हापूर

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

Scanned with CamScanner

## विवरणपत्र 'अ'

कला, विज्ञान व वाणिज्य (वरिष्ठ व कनिष्ठ) महाविद्यालयातील प्रशासकीय कार्यालयासाठी लिपीक वर्ग/प्रशासकीय पदे याचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील.

**टिपः-** महाविद्यालयातील ग्रंथालय व प्रयोगशाळेसाठी जो चतुर्थश्रेणी कर्मचारी लागेल त्या पदाच्या प्रशासकीय पदामध्ये समावेश नाही.

वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे विभाग धरुन

(१) ५०० विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालये
१ मुख्य लिपीक
१ वरिष्ठ लिपीक
१ कनिष्ठ लिपीक/टंकलेखक
३ तीन.

(२) ५०१ ते १००० विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालये
१ अधिक्षक
१ मुख्य लिपीक
१ वरिष्ठ लिपीक
२ कनिष्ठ लिपीक/टंकलेखक
५ पाच

(३) १००१ ते १५०० विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालये
१ अधिक्षक
१ मुख्य लिपीक
२ वरिष्ठ लिपीक
३ कनिष्ठ लिपीक/टंकलेखक
७ सात

) १५०१ ते २००० विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालये
१ अधिक्षक
१ मुख्य लिपीक
२ वरिष्ठ लिपीक
६ [illegible]ष्ठ लिपीक/टंकलेखक

१

(५) २००१ ते २५०० विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालये
१ कुलसचिव/प्रबंधक (कनिष्ठ श्रेणी)
१ अधिक्षक
१ मुख्य लिपीक
१ वरिष्ठ लिपीक
५ कनिष्ठ लिपीक/टंकलेखक
९ नउ

(६) २५०१ ते ३००० विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालये
१ कुलसचिव/प्रबंधक (कनिष्ठ श्रेणी)
१ अधिक्षक
१ मुख्य लिपीक
२ वरिष्ठ लिपीक
६ कनिष्ठ लिपीक/टंकलेखक
११ अकरा

(७) ३००१ ते ४००० विद्यार्थी संख्या असलेले महाविद्यालये
१ कुलसचिव/प्रबंधक (कनिष्ठ श्रेणी)
१ अधिक्षक
१ मुख्य लिपीक
३ वरिष्ठ लिपीक
७ कनिष्ठ लिपीक/टंकलेखक
१३ तेरा

(८) ४००० संख्या पेक्षा विद्यार्थी असलेले महाविद्यालये
१ कुलसचिव/प्रबंधक (वरिष्ठ श्रेणी)
१ अधिक्षक
१ मुख्य लिपीक
३ वरिष्ठ लिपीक
७ कनिष्ठ लिपीक/टंकलेखक

अधिक पुढील प्रत्येक ३०० विद्यार्थ्यांमागे १ कनिष्ठ लिपीक व ३ कनिष्ठ लिपिकांच्या वरील १ पद वरिष्ठ लिपीकांचे पदश्रेणीत अनुज्ञेय.

2248

900 – 3+1

1200 — 3 + 1

900 – 3

2100 5

Scanned with CamScanner

## विवरणपत्र 'ब'

| विद्यार्थी संख्या | प्रयोगशाळा सहाय्यक | प्रयोगशाळा परिचर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| पहिल्या १५० विद्यार्थी संख्येपर्यन्त | १ | ४ |
| १५० ते १९० | १ | ४ |
| १९१ ते २३० | १ | ५ |
| २३१ ते २७० | २ | ६ |
| २७१ ते ३०० | २ | ७ |
| ३०१ ते ३४० | २ | ८ |
| ३४१ ते ३८० | २ | ९ |
| ३८१ ते ४२० | ३ | १० |
| ४२१ ते ४५० | ३ | ११ |
| ४५१ ते ४९० | ३ | १२ |
| ४९१ ते ५२० | ३ | १३ |
| ५२१ ते ५६० | ४ | १४ |
| ५६१ ते ६०० | ४ | १५ |
| ६०१ ते ६४० | ४ | १६ |
| ६४१ ते ६८० | ४ | १७ |
| ६८१ ते ७२० | ५ | १८ |
| ७२१ ते ७५० | ५ | १९ |
| ७५१ ते ७९० | ५ | २० |
| ७९१ ते ८३० | ५ | २१ |
| ८३१ ते ८७० | ६ | २२ |
| ८७१ ते ९०० | ६ | २३ |
| ९०१ ते ९४० | ६ | २४ |
| ९४१ ते ९८० | ६ | २५ |
| ९८१ ते १०२० | ७ | २६ |
| १०२१ ते १०५० | ७ | २७ |
| १०५१ ते १०९० | ७ | २८ |
| १०९१ ते ११३० | ७ | २९ |
| ११३१ ते ११७० | ८ | ३० |
| ११७१ ते १२०० | ८ | ३१ |
| १२०१ ते १२४० | ८ | ३२ |
| १२४१ ते १२८० | ८ | ३३ |
| १२८१ ते १३२० | ९ | ३४ |
| १३२१ ते १३५० | ९ | ३५ |
| १३५१ ते १३९० | ९ | ३६ |
| १३९१ ते १४३० | ९ | ३७ |
| १४३१ ते १४७० | १० | ३८ |
| १४७१ ते १५०० | १० | ३९ |

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या [illegible]

अकृषि विद्यापीठे व संलग्न अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: एनजीसी १०९३/(२६३६)/विशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २६ सप्टेंबर, १९९५.

शासन निर्णय:- महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक शर्ती व अटी) नियम १९८४ मधील नियम क्रमांक १० अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कामाचे तास व उपस्थिती हे ठरवून देण्यात आले आहेत. त्यानुसार वर्ग १,२ व ३ च्या कर्मचाऱ्यांना आठवड्याचे ३८½ तास व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना आठवड्याचे ४० तास भोजनाची सुट्टी धरून ठरवून देण्यात आले आहे.

२. अकृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामाचे तास शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासाप्रमाणे असावेत ही कर्मचारी महासंघाची मागणी काही काळ शासनाच्या विचाराधीन होती. यावर आता विचार करता असे शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

अकृषि विद्यापीठे व संलग्न अशासकीय महाविद्यालयांतून काम करणाऱ्या

(अ) वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांसाठी आठवड्याचे कामाचे एकूण तास ४२

(ब) वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांसाठी आठवड्याचे कामाचे एकूण तास ४६

वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यालयीन वेळेत भोजनाची सुट्टी अर्ध्या तासाची राहील.

३. या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे दुसऱ्या व चौथ्या शनिवारी पूर्ण सुट्टी द्यावी किंवा दर शनिवारी कार्यालय अर्धा दिवस चालू ठेवावे, याबाबतचा निर्णय संबंधित विद्यापीठांनी महाविद्यालयांशी चर्चा करून घ्यावयाचा आहे. मात्र दर आठवड्याला कामाच्या तासिका वर दिल्याप्रमाणे निश्चित राहतील याची त्यांनी खातरजमा घ्यावयाची आहे.

४. महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये प्रमाणसंहिता (शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक शर्ती व अटी) नियम १९८४ मधील नियम १० मध्ये वरील

कृ.मा.प.

Inward No. 558 [illegible]-96
Principal

प्रमाणे सुधारणा करण्याचे आदेश यथायोग्य स्वरूपात [illegible] काढण्यात येतील.

५. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे व कुलसचिव, सर्व कृषितर विद्यापीठे, यांना विनंती की, हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

हे आदेश सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १६५/सेवा-५ व ४०७/९६/सेवा-९, दि.२१.८.१९९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( चि.श.सेन)
आयुक्त, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल व कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ( ५ प्रती )
सर्व विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल ( लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव
सर्व अशासकीय महाविद्यालये ( शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना प्रती पाठवाव्यात.)
सामान्य प्रशासन विभाग ( का. १८ ( र.व.का.), मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री/राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, विशि-४

जा.क्र.शिसंच/वेतन अनुदान/पुणे
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
पुणे विभागीय कार्यालय
पुणे-४११००१.
दिनांक- 2 8 [illegible] 1995

प्राचार्य/प्राचार्या. अशासकीय कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे पुणे/नाशिक/अहमदनगर यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभागीय कार्यालय करिता
पुणे-४११००१.